महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(३)/२०२२/तेवीस दिनांक : २७ मे, २०२४.

## -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट- ब मुख्य परीक्षा - २०२२**
**पोलीस उपनिरीक्षक**

महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा - २०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचे उमेदवार श्री. संतोष देविदास नागरगोजे व श्री. प्रशांत मोरेश्वर मारबते यांनी मा. मॅट, नागपूर येथे दाखल केलेल्या अनुक्रमे मूळ अर्ज क्र.३५४/२०२४ व मूळ अर्ज क्र.४८७/२०२४ वरील मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २२ मे, २०२४ रोजीच्या आदेशानुसार त्यांचा मुख्य परीक्षेचा निकाल प्रसिध्द करण्यात येत आहे त्यानुसार श्री. नागरगोजे व श्री. मारबते हे महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा – २०२२ मधून पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीकरिता अर्हताप्राप्त ठरत आहेत.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जाद्वारे सादर केलेले दावे/अर्हतेच्या आधारेच निवडीसाठी पात्रता अजमाविण्यात येईल.

४. आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. श्री. नागरगोजे व श्री. मारबते यांची शारीरिक चाचणी दिनांक ०१ जून, २०२४ रोजी पोलीस मुख्यालय, रोडपाली, सेक्टर-१७, कळंबोली, नवी मुंबई येथे घेण्यात येईल. शारीरिक चाचणीबाबतचे पत्र त्यांच्या प्रोफाईलवर उपलब्ध करून देण्यात येईल.

६. श्रीमती नागरगोजे व श्री. मारबते यांची शारीरिक चाचणी परिशिष्ट ‘अ’ प्रमाणे डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित प्रणालीद्वारे घेण्यात येईल.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : नवी मुंबई.

## परिशिष्ट - अ

## पुरुष उमेदवारांकरिता

## महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०२२ (पोलीस उपनिरीक्षक)

**शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-**

**(१) धावणे** - यासाठी उमेदवारास ८०० मीटर (अर्धा मैल) धावावे लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण ८०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ०२.३० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०२.४० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................. | ४४ |
| ०२.४० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०२.५० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | ३७.५ |
| ०२.५० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.०० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | ३१ |
| ०३.०० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.१० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................. | २५ |
| ०३.१० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.२० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................. | १९ |
| ०३.२० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................. | १२.५ |
| ०३.३० मिनिटांपेक्षा जास्त | ० |

**उमेदवार ८०० मीटरचे अंतर धावू न शकल्यास त्यास शून्य गुण देण्यात येतील.**

**(२) पुलअप्स -** क्षितिज समांतर खांबावर उमेदवारास आठ पुलअप्स काढावे लागतील. यासाठी एकूण २० गुण देण्यात येतील म्हणजेच एका पुलअपसाठी २.५ गुण राहतील. उमेदवाराची छाती सहजपणे आडव्या खांबाला टेकल्यानंतर त्याने एक पुलअप पूर्ण केला असे समजण्यात येईल असे करताना उमेदवाराने न झगडता आणि / अथवा आपले पाय न झाडता किंवा न वाकवता एक पुलअप पूर्ण केल्यास त्यास पूर्ण २.५ गुण देण्यात येतील. पुलअप काढताना उमेदवारास झगडावे लागले आणि अथवा त्याने आपले पाय झाडले किंवा वाकवले तर एका गुणांपर्यंत गुण कमी होतील. जर उमेदवारास पुलअप काढता आला नाही म्हणजेच त्याला त्याची छाती आडव्या खांबाला टेकवता आली नाही तर त्या पुलअपसाठी त्याला एकही गुण मिळणार नाही.

**(३) गोळा फेक** - उमेदवारास ७.२६० किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :--

| गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ७.५० मीटर किंवा जास्त ................. ................. ................. ................. | १५ |
| ७.०० मीटर किंवा जास्त परंतु ७.५० मीटरपेक्षा कमी ................. ................. | १२.५ |
| ६.५० मीटर किंवा जास्त परंतु ७.०० मीटरपेक्षा कमी ................. ................. | १० |
| ६.०० मीटर किंवा जास्त परंतु ६.५० मीटरपेक्षा कमी ................. ................. | ७.५ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.०० मीटरपेक्षा कमी ................. ................. | ५ |
| ५.०० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी ................. ................. | २.५ |
| ५.०० मीटरपेक्षा कमी | ० |

**(अ)** गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

**(ब)** गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. **उदा. जर गोळाफकीचे अंतर ६ मीटर असेल तर उमेदवाराला ७.५ गुण देण्यात येतील.**

**(४) लांब उडी** - यासाठी उमेदवारास धावत येऊन लांब उडी मारावी लागेल. लांब उडीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील:-

| उडीचे अंतर | गुण |
|---|---|
| ०४.५० मीटर किंवा जास्त ................. ................. ................. ................. | १५ |
| ०४.३५ मीटर किंवा जास्त परंतु ०४.५० मीटरपेक्षा कमी ................. ................. | १४ |
| ०४.२० मीटर किंवा जास्त परंतु ०४.३५ मीटरपेक्षा कमी ................. ................. | १२ |
| ०३.९० मीटर किंवा जास्त परंतु ०४.२० मीटरपेक्षा कमी ................. ................. | १० |
| ०३.६० मीटर किंवा जास्त परंतु ०३.९० मीटरपेक्षा कमी ................. ................. | ८ |
| ०३.३० मीटर किंवा जास्त परंतु ०३.६० मीटरपेक्षा कमी ................. ................. | ६ |
| ०३.०० मीटर किंवा जास्त परंतु ०३.३० मीटरपेक्षा कमी ................. ................. | ४ |
| ०२.५० मीटर किंवा जास्त परंतु ०३.०० मीटरपेक्षा कमी ................. ................. | २ |
| २.५० मीटरपेक्षा कमी ................. ................. ................. ....................... | ० |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक, म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलीकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फ़ायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास शून्य गुण देण्यात येतील.

**टीप :- (१)** वरील चाचणी प्रकारच्या सरावासाठी उमेदवारांना राज्यातील पोलीस कवायत मैदानाचा उपयोग करता येईल. तसेच त्यांना पोलीस निदेशकाची मदत देण्यात येईल. परंतु यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथील पोलीस उप आयुक्त, पोलीस मुख्यालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(२)** शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के गुण (म्हणजे ६० गुण) मिळणे आवश्यक आहे. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरिता विचार होणार नाही.

**(३)** सर्व शारीरिक चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

*-*-*-*-*